For. MA- Sem-III - Paper - 2 Credit - Introduction (...

DATE PAGE NO



## १. भारतीय राज्यघटनेचे तत्वज्ञान

### * भारतीय राज्यघटनेची निर्मिती

प्रस्तावना :-

भारतात शंभर-सव्वाशे वर्षे ब्रिटिशांचे अधिराज्य होते. १८५७ ते १९४७ पर्यंत भारतीयांना ब्रिटिश सत्तेशी संघर्ष करावा लागला. १८८५ मध्ये सर 'ॲलन ऑक्टोव्हियन ह्यूम' यांच्या पुढाकाराने जी राष्ट्रीय सभा (National Congress) स्थापन करण्यात आली त्या कॉंग्रेसच्याच वाटचालीचे अंतिम पर्यवसान स्वातंत्र्यात झाले. इ.स. १६०० मध्ये इंग्लंडची राणी पहिली एलिझाबेथ हिने ब्रिटिश ईस्ट इंडीया कंपनीला भारतात व्यापार करण्याची संधी दिली. १६०० ते १७६५ पर्यंत कंपनीचे स्वरुप व कार्य पुर्णपणे व्यापारी होते. १७५७ साली ईस्ट इंडिया कंपनीने (गव्हर्नर रॉबर्ट क्लाईव्हने) प्लासीच्या लढाईत विजय मिळवून भारतात ब्रिटिश सत्तेचा पाया घातला. ई.स. १७७३ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने ईस्ट इंडिया कंपनीवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'रेग्यूलेटींग ॲक्ट' कायदा पास केला. बंगालचा गव्हर्नर हा संपुर्ण भारतीय प्रदेशाचा गव्हर्नर जनरल झाला. कलकत्ता येथे सर्वोच्च न्यायालय स्थापन करण्यात आले. ई.स. १७७३ नियंत्रण कायद्यातील दोष दुर करण्यासाठी १७८४ मध्ये पिट्स इंडिया ॲक्ट कायदा पास करण्यात आला.

इ.स. १८७१ चा भारत सरकार संबंधीचा कायदा आणि इ.स. १८९२ चा भारत सरकार संबंधीचा कायदा असे दोन कायदे ब्रिटिश पार्लमेंटने मंजूर केले.

मोर्ले-मिंटो सुधारणा (१९०९ चा कौन्सिल कायदा)

१८८५ ते १९०५ या काळात लॉर्ड लॅन्सडाऊन, लॉर्ड एल्गिन व लॉर्ड कर्झन या व्हाईसरॉयच्या काळात भारतीय जनतेवर अन्याय जुलूम झाला. १९०५ साली बंगालचे विभाजन करून हिन्दू-मुस्लिम यांच्यात फुट पाडण्याचा प्रयत्न झाला. या परिस्थीतीमुळे भारतीय जनतेत असंतोष वाढत चालला होता. तेंव्हा भारतीय जनतेला संतुष्ट करण्यासाठी काही सुधारणा करणे ब्रिटिशांना आवश्यक वाटू लागले त्यावेळेसचे व्हाईसरॉय लॉर्ड मिन्टो व सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड मोर्ले यांनी परस्परांशी विचारविनिमय करून सुधारणा घडवून आणण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने १९०९ च्या लॉर्ड मोर्ले-मिंटो कायद्याला मंजुरी दिली. या कायद्याने विधीमंडळ संख्या १६ ची ६९ करण्यात आली. कायदेमंडळाच्या अधिकारात वाढ करण्यात आली. व मुस्लिमांना स्वतंत्र प्रतिनीधीत्व देण्यात आले पुढे भारत- पाकीस्तान फाळणीला हा कायदा कारणीभूत ठरला.

१९१९ चा भारत प्रशासन कायदा (मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा)

मोर्ले-मिंटो कायदा भारतीय जनतेला संतुष्ट करण्यात अपयशी ठरला

## १. भारतीय राज्यघटनेचे तत्वज्ञान



### * भारतीय राज्यघटनेची निर्मिती

प्रस्तावना :-

भारतात शंभर-सव्वाशे वर्षे ब्रिटीशांचे अधिराज्य होते. १८५७ ते १९४७ पर्यंत भारतीयांना ब्रिटीश सत्तेशी संघर्ष करावा लागला. १८८५ मध्ये सर 'ॲलन ऑक्टोव्हियन ह्यूम' यांच्या पुढाकाराने जी राष्ट्रीय सभा (National congress) स्थापन करण्यात आली त्या कॉंग्रेसच्याच वाटचालीचे अंतिम पर्यवसान स्वातंत्र्यात झाले. इ.स. १६०० मध्ये इंग्लंडची राणी पहिली एलिझाबेथ हिने ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला भारतात व्यापार करण्याची संधी दिली. १६०० ते १७६५ पर्यंत कंपनीचे स्वरुप व कार्य पुर्णपणे व्यापारी होते. १७५७ साली ईस्ट इंडिया कंपनीने (गव्हर्नर रॉबर्ट क्लाईव्हने) प्लासीच्या लढाईत विजय मिळवून भारतात ब्रिटिश सत्तेचा पाया घातला. ई.स. १७७३ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने ईस्ट इंडिया कंपनीवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'रेग्यूलेटींग ॲक्ट' कायदा पास केला. बंगालचा गव्हर्नर हा संपुर्ण भारतीय प्रदेशाचा गव्हर्नर जनरल झाला. कलकत्ता येथे सर्वोच्च न्यायालय स्थापन करण्यात आले. ई.स. १७७३ नियंत्रण कायद्यातील दोष दुर करण्यासाठी १७८४ मध्ये पिट्स इंडिया ॲक्ट कायदा पास करण्यात आला.

इ.स. १८७१ चा भारत सरकार संबंधीचा कायदा आणि इ.स. १८९२ चा भारत सरकार संबंधीचा कायदा असे दोन कायदे ब्रिटीश पार्लमेंटने मंजूर केले.

मोर्ले-मिंटो सुधारणा (१९०९ चा कौन्सिल कायदा)

१८८५ ते १९०५ या काळात लॉर्ड लॅन्सडाऊन, लॉर्ड एल्गिन व लॉर्ड कर्झन या व्हाईसरॉयच्या काळात भारतीय जनतेवर अन्याय जुलूम झाला. १९०५ साली बंगालचे विभाजन करून हिन्दू-मुस्लिम यांच्यात फुट पाडण्याचा प्रयत्न झाला. या परिस्थीतीमुळे भारतीय जनतेत असंतोष वाढत चालला होता. तेव्हा भारतीय जनतेला संतुष्ट करण्यासाठी काही सुधारणा करणे ब्रिटीशांना आवश्यक वाटू लागले त्यावेळेसचे व्हाईसरॉय लॉर्ड मिन्टो व सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड मोर्ले यांनी परस्परांशी विचारविनिमय करून सुधारणा घडवून आणण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने १९०९ च्या लॉर्ड मोर्ले-मिंटो कायद्याला मंजुरी दिली. या कायद्याने विधीमंडळ संख्या १६ ची ६९ करण्यात आली. कायदेमंडळाच्या अधिकारात वाढ करण्यात आली. व मुस्लिमांना स्वतंत्र प्रतिनीधीत्व देण्यात आले पुढे भारत-पाकिस्तान फाळणीला हा कायदा कारणीभूत ठरला.

१९१९ चा भारत प्रशासन कायदा (मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा)

मोर्ले-मिंटो कायदा भारतीय जनतेला संतुष्ट करण्यात अपयशी ठरला

यामुळे ब्रिटीश पार्लमेंटला पुढील दहा वर्षांच्या आतच ब्रिटीश पार्लमेंटला १९१९ चा मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायदा करावा लागला. दरम्यान राष्ट्रीय काँग्रेसने आपला लढा चालुच ठेवला. जहाल नेत्यांनी प्रखर संघर्ष ब्रिटीशांशी चालु ठेवला. लोकमान्य टिळकांनी ॲनी बेझंट यांच्या सहकार्याने होमरुल चळवळ चालू ठेवून भारतीयांना स्वयंनिर्णयाचा अधिकार प्राप्त व्हावा यासाठी राष्ट्रीय आंदोलन उभारले. दरम्यान १९१४ ला पहिले महायुद्ध सुरु झाले. या युद्धात भारतीयांचे सहकार्य मिळविण्याचे ब्रिटीशांचे प्रयत्न चालू होते. भारतीय परिस्थितीचे निरिक्षण करुन भारतीय नेत्यांशी विचारविनिमय करुन मॉंटेग्यू चेम्सफोर्ड यांच्या सहकार्याने १९१९ च्या कायद्याला ब्रिटीश पार्लमेंटने मंजुरी दिली. त्यानुसार पुढील बदल करण्यात आले.

१) भारतीय कायदेमंडळाला कार्यकारीमंडळापासुन स्वतंत्र ठेवण्यात आले. केंद्रीय कायदेमंडळात द्विगृही कायदेमंडळ पद्धती स्विकारण्यात आली.

२) प्रांतात एकगृही कायदेमंडळ पद्धती ठेवली. परंतू संख्या लोकप्रतिनीधींची वाढविली.

३) प्रांतात द्विदल पध्दतीचा (System of Diarchy) स्विकार करण्यात आला. राखीव व सोपीव खाती प्रांतात निर्माण करण्यात आली.

अशाप्रकारे भारतात जबाबदार शासनपध्दती आणि संसदीय लोकशाहीचा प्रयोग सुरु करण्याच्या दृष्टीने कायद्याचे महत्व नाकारता येणार नाही.

## १९३५ चा भारत प्रशासन कायदा

इ.स. १९१९ ते १९३५ या काळात भारतीयांनी ब्रिटीशांशी असहकार पुकारला १९२७ साली सायमन कमिशन नेमण्यात आले. त्यावर भारतीयांनी बहिष्कार टाकला १९२८ च्या कोलकत्ता काँग्रेस अधिवेशनात वसाहतीच्या स्वराज्याची मागणी केली परंतू ब्रिटीश सरकारने एक वर्षाच्या आत दिले नाही म्हणुन १९३० च्या लाहोर अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. १९३० साली म. गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली. ती देशभर पसरली. अशा राजकीय परिस्थीतीत ब्रिटीश सरकारला प्रशासकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी कायदा करणे आवश्यक वाटु लागले. भारतीय जनतेला स्वयंशासनाचा अधिकार प्रदान करुन त्यांच्यातील असंतोष संपुष्टात आणण्याच्या हेतुने १९३५ च्या कायदा केला.

१) या कायद्यानुसार भारतात संघराज्य पध्दती अस्तित्वात आली.

२) केंद्र व राज्य यांच्यात अधिकार विभागणी केली केंद्रसूची, राज्यसूची व समवर्ती सूची अस्तित्वात आल्या.
३) केंद्रस्थानी द्विगृहात्मक कायदेमंडळ पध्दती स्विकारण्यात आली
४) संघिक न्यायालयाची तरतूद करण्यात आली.

या कायद्याची पुर्णपणे अंमलबजावणी होऊ शकली नाही या कायद्यानुसार १९३७ साली पहिली सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली ११ प्रांतापैकी ८ प्रांतात कॉंग्रेसला बहुमत मिळाले कॉंग्रेसने सात प्रांतात आपली मंत्रिमंडळे बनविली. १९३९ पर्यंत व्यवस्थित कार्ये केले परंतू दुसऱ्या महायुध्दाची सुरुवात होताचक्षणी भारतीय नेत्यांना विश्वासात न घेताच भारत इंग्लंडच्या बाजुने महायुध्दात उतरत आहे असे घोषित केले. या कृतीमुळे आठही प्रांतातील कॉंग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले व पुन्हा ब्रिटीश सरकारशी संघर्ष करू लागली.

क्रिप्स योजना

इंग्लंड दुसऱ्या महायुध्दात गुंतलेले असतांना भारतीय जनतेत असंतोष वाढू देणे हिताचे नाही हे ओळखून पंतप्रधान चर्चिल यांनी ११ मार्च १९४२ रोजी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली एक मंडळ भारतात पाठविले त्यातील तरतूदी पुढीलप्रमाणे

१) युध्द समाप्तीनंतर भारताला वसाहतीचे स्वराज्य देण्यात येईल.
२) युध्दानंतर भारतीय संघराज्याची घटना निर्माण करण्यासाठी घटना समिती बोलविण्यात येईल.
३) निर्माण केलेली राज्यघटना स्विकारण्याचे बंधन ब्रिटीशांवर राहील.
४) युध्दकाळात भारताच्या संरक्षणाची जबाबदारी ब्रिटीश सरकारवर राहील.

हि योजना कॉंग्रेस व मुस्लीम लीग यांनी फेटाळली "दिवाळे निघालेल्या बॅंकेवर काढलेला पुढील तारखेचा चेक" अशा शब्दात म. गांधींनी या योजनेचा निषेध केला त्यामुळे क्रिप्स यांना हात हालवित इंग्लंडला परतावे लागले

ब्रिटीश सरकार भारताला पुर्णपणे स्वातंत्र्य देणार नाही याची जाणिव सर्व भारतीय नेत्यांना व जनतेला झाली. ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई कॉंग्रेस अधिवेशनात 'चलेजाव' ठराव मंजुर झाला.

वरील प्रस्ताव मंजुर केल्यानंतर काही तासाच्या आतच सरकारने

नेत्यांची धरपकड सुरु केली. म. गांधींना अटक करुन पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये ठेवण्यात आले. कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सर्व सभासदांना अहमदनगरच्या किल्ल्यामध्ये बंदिस्त करण्यात आले. बैठकीत हजर नसलेल्या राजेंद्रबाबुंना पाटण्यामध्ये अटक करण्यात आली.

अटकेची बातमी देशभर वाऱ्यासारखी पसरली जनतेने मन मानेल त्या मार्गाने संताप व्यक्त केला. रेल्वेमार्ग व तारा तोडण्यात आल्या प्रति-सरकारे स्थापन करण्यात आली क्रांती मोडुन काढण्यासाठी प्रसंगी गोळीबार, विमानांचा वापर करण्यात आला. १०२८ लोक मरण पावले.

देशभर चाललेल्या या हिंसक कृत्यामागे कॉंग्रेस नेत्यांचे हात आहेत दुटप्पीपणा, अप्रामाणिकपणा व अनैतिकतेचा आरोप गांधीजींवर सरकारतर्फे केला जाऊ लागला. न्यायालयीन चौकशीस आपण तयार आहोत असे म. गांधीजींनी सांगितले पण सरकार चौकशीहि करीना आरोपहि मागे घेईना या अवस्थेत १० फेब्रुवारी १९४३ रोजी म. गांधींनी २१ दिवसांचे उपोषण केले १३ दिवसांनंतर त्यांची प्रकृती चांगलीच खालावली. गव्हर्नर लॉर्ड लिनलिथगो हा म. गांधींच्या मृत्यूचीच वाट पाहत होता. असे म्हटले जाते. नविन गव्हर्नर लॉर्ड वेव्हेल याने पुढे एप्रिल १९४४ मध्ये गांधीजी चांगलेच आजारी पडले तेव्हा त्यांना मुक्त करण्याचा निर्णय घेतला. ६ मे १९४४ रोजी सुटका केली.

## कॅबिनेट मिशन योजना (त्रिमंत्री योजना)

कॅबिनेट मिशन भारतात येण्यापूर्वी ब्रिटन व भारतातील राजकीय परिस्थीतीमध्ये कमालीचे बदल घडुन आले.

१ हुजूर पक्षाचा पराभव :-

दुसरे महायुद्ध संपुन दोस्त राष्ट्रांनी 'विजय' मिळविला होता. युद्ध समाप्तीनंतर इंग्लंडमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीत चर्चिल यांच्या हुजूर पक्षाचा पराभव झाला. त्यांच्या मंत्रिमंडळातील भारतमंत्री ॲमेरी याला त्याच्या मतदार संघात जबर पराभव स्विकारावा लागला. ॲटलींच्या नेतृत्वाखालील मजुर पक्षाचे सरकार १९४५ च्या जुलै महिन्यात सत्तेवर आले. या पक्षाचे धोरण सुरुवातीपासुनच भारताविषयी सहानु-भूतीचे होते. ॲटलींनी पहिल्याच भाषणात " भारतातील पेचप्रसंग सोडविण्या-साठी कॉंग्रेसच्या नेत्यांची सुटका केली पाहिजे. वाटाघाटी केल्या पाहिजे. भारताला शक्य तितक्या लवकर स्वातंत्र्य प्राप्तीच्या कामी सहकार्य केले पाहिजे जाईल असे म्हटले.

भारतातील परिस्थीती आणि मजुर पक्षाच्या आश्वासनांचा मेळ घालण्यासाठी गव्हर्नर लॉर्ड वॅव्हेलला इंग्लंडला बोलविण्यात आले. परत आल्यानंतर आकाशवाणी-वरुन भाषण केले कि, "युद्धामुळे न होऊ शकलेल्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणूका लगेच घेतल्या जातील सर्व प्रांतातून राजकीय पक्षांनी मंत्रिमंडळे स्थापन करावी. आणि निवडणूकीत यशस्वी झालेल्यांशिच भावी घटनेबाबत विचारविनिमय करुन घटनासमिती बनविली जाईल"

प्रत्यक्ष निवडणूका व निकाल यामध्ये दिसुन आले कि, कॉंग्रेसचे उमेदवार मोठ्या संख्येने निवडून आले त्याचबरोबर हेही सिद्ध झाले कि, मुस्लिमांसाठीच्या राखीव जागा लीगने जिंकल्या.

१९४६ साली इंग्लंडचे पंतप्रधान लॉर्ड ॲटली यांनी भारतातील पेचप्रसंग सोडविण्यासाठी आपल्या मंत्रिमंडळातील तीन मंत्री सर पॅथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स, व अल्बर्ट ॲलेक्झांडर यांना भारतात पाठविले या कॅबिनेट मिशनने भारतातील राजकीय परिस्थीतीचा अभ्यास करुन पुढील सुचना केल्या.

१ ब्रिटिश, भारत व संस्थाने यांचे मिळून संघराज्य निर्माण करण्यात येईल
२ संघराज्यासाठी स्वतंत्र कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ निर्माण करण्यात येईल
३ प्रांतिक कायदेमंडळांनी एक घटनासमिती तयार करावी त्यात ३८९ सदस्य असतील
४ प्रांतांचे अ, ब आणि क असे गट पाडुन प्रत्येक प्रांतासाठी घटना तयार करावी नंतर या प्रतिनिधींनी एकत्र येऊन संघराज्याची घटना तयार करावी असे ठरलेगेले
५ दर दहा वर्षांनी घटनेत दुरुस्तीचा अधिकार प्रांतांना देण्यात आला.
६ घटनानिर्मिती होईपर्यंत हंगामी सरकार स्थापन करावे.
७ भारताने राष्ट्रकुलाचे सभासद रहावे अशी अपेक्षा राहील पण याबाबत अंतिम निर्णय शेवटी भारतानेच घ्यायचा आहे.
८ पाकिस्तानच्या निर्मितीला स्पष्ट नकार

भारतातील राजकीय पक्षांनी त्रिमंत्री योजना स्विकारली असली तरीही त्यांना ही योजना पसंत नव्हती कारण त्रिमंत्री योजनेमुळे केंद्रसत्ता दुबळी बनली होती त्यामुळे संघराज्याचे अस्तित्व धोक्यात आले होते तसेच या योजनेत पाकिस्तानच्या मागणीचा विचारच केलेला नव्हता त्यामुळे मुस्लिम लीग पक्ष नाराज झालेला होता. दोन्ही पक्षांनी हंगामी सरकारात भाग घेण्यास नकार दिला.

माऊंटबॅटन योजना (१९४७) (हिंदुस्थान सोडण्याचा निर्णय)

इंग्लंडने पूर्ण विचारांनी हिंदुस्थान बाबतीत सत्तांतर करण्याचा निर्णय घेतला असुन शेवटची तारिख जून १९४८ मध्ये असेल असे फेब्रुवारी१९४७

रोजी ॲटलींनी जाहिर केले. या घोषणेमुळे लीगला एकप्रकारे चिथावणी मिळाल्या-सारखे झाले. वेळ पडल्यास प्रांतांना सत्ता दिली जाणार म्हणुन वायव्य सरहद्द प्रांत व पंजाबमधील लीगविरोधी मंत्रिमंडळे उलथून पाडण्याचा दंगाधोप्यांचा निकराचा प्रयत्न लीगने सुरु केला. परिणामी पंजाबमध्ये युनियानिष्ट पक्षाच्या खिजर हयात खान मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागला. व गव्हर्नरांनी प्रमार्चला पंजाबचा कारभार आपल्या हाती घेतला आसाम व पंजाबमध्ये शेकडो मुसलमान अमुक एक भाग आपल्या वर्चस्वाखाली यावा म्हणुन तेथे घुसत. त्यातुन भयानक असे खून, लुटालुट मारामाऱ्या जाळपोळ यांचे सत्र देशभर उभे राहीले. अशा प्रकारची स्थिती जून १९४८ पर्यंत सुध्दा राहू देणे बरोबर नाही असे सरकारला वाटले.

माऊंटबॅटन यांची नेमणूक

ॲटलींनी वर सांगितलेली जी सत्तांतराची घोषणा केली त्याचबरोबर हेही जाहिर केले कि, गव्हर्नर जनरल लॉर्ड वेव्हेल यांना परत बोलविण्यात येत असुन त्यांच्या जागी सत्तांतराचा हा प्रश्न हाताळण्यासाठी लॉर्ड माऊंटबॅटन यांची नेमणुक केली जात आहे. २२ मार्च १९४७ ला माऊंटबॅटन भारतात आले. जून १९४८ च्या पूर्वीसुध्दा सत्तांतराची व्यवस्था होऊ शकत असल्यास पहा अशा सुचना ॲटलींनी त्यांना दिल्या होत्या. २४ मार्चला अधिकारसूत्रे स्वीकारल्याबरोबर त्यांनी वाटाघाटींना सुरुवात केली. पुढाऱ्यांशी चर्चा करुन एकंदर भारतीय परिस्थीतीची पाहणी करुन रक्तपात आणि यादवी युद्धापासुन भारताला वाचविण्याचा उपाय म्हणजे फाळणी करुन पाकिस्तानची निर्मिती करणे हा होय. असे मत माऊंटबॅटन यांनी बनविले या मताला ब्रिटिश सरकारची अनुमती मिळविण्यासाठी मे १९४७ला ते ब्रिटनला गेले तेथून परत आल्यावर ३ जुन १९४७ ला एक निवेदन प्रसिध्द करुन भारतातील पेचप्रसंग सोडविण्याची योजना त्यांनी जाहिर केली. हीच ती भारताची फाळणी करणारी माऊंटबॅटन योजना होय.

योजनेतील मुख्य तरतूदी

१) पंजाब व बंगाल या दोन प्रांतांचे विभाजन करुन हिंदू लोकांचा भाग भारताला आणि मुस्लीम लोकांचा भाग पाकिस्तानला जोडण्यात येईल भारतात सामिल व्हायचे कि पाकिस्तानात हे ठरविण्याचा अधिकार त्यांना असेल.

२) सिंध प्रांताची विधानसभा सिंध प्रांतासंबंधी निर्णय घेईल. तसा स्वयंनिर्णयाचा अधिकार सिंध प्रांताला देण्यात येईल

३) वायव्य सरहद्द प्रांत व आसामचा सिल्हेट जिल्हा यांना सार्वमताचा अधिकार देण्यात येईल.

४) फाळणी झाल्यास एक सीमा आयोग नेमून भारत व पाकिस्तान या देशांच्या सीमा निश्चित करण्यात येतील.

५) देशी राज्यांना कोणत्याही राज्यात सामील व्हायचे किंवा स्वतंत्र राज्य म्हणुन राहण्याचे स्वातंत्र्य देण्यात येईल.

६) भारताला सत्ता देण्यासाठि ब्रिटीश सरकार जून १९४८ पर्यंत वाट पाहणार नाही १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीच हे सत्तांतराचे कार्य पूर्ण करण्यात येईल.

या योजनेला कॉंग्रेस, मुस्लिम लीग यांनी तत्वतः मान्यता दिली. सीमा निर्धारण करण्यासाठी सर रॅडक्लिफ यांच्या अध्यक्षतेखाली एक मंडळ नेमण्यात आले. वरील योजनेला (माऊंटबॅटन) कायदेशिर स्वरुप देण्यासाठी ४ जुलै १९४७ रोजी भारतीय स्वातंत्र्याचे विधेयक ब्रिटिश पार्लमेंटमध्ये मांडण्यात आले. पार्लमेंटने ते संमत केले व त्याचेच रुपांतर भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यात झाले.

## भारतीय संविधानाचे निर्माण

कॅबिनेट मिशन योजनेप्रमाणे जी व्यवस्था जाहिर करण्यात आली होती तिला सुरुवातीला निरनिराळ्या कारणांनी का होईना पण भारतातल्या प्रमुख राजकीय पक्षांनी पाठींबा दिला होता. ६ जून १९४६ रोजी लीगने या योजनेला मान्यता दिली. स्वतंत्र अखंड व लोकशाही भारताची घटना तयार करण्यासाठी ठरु घातलेल्या घटना समितीत भाग घेण्याचा निर्णय २६ जून १९४६ रोजी कॉंग्रेस कार्यकारीणीने घेतला.

## घटना समितीच्या निवडणूका

कॅबिनेट मिशन योजनेप्रमाणे घटना समितीच्या निवडणूका जुलै १९४६ मध्ये झाल्या. मुळ योजनेप्रमाणे ३८९ सभासद अप्रत्यक्ष पध्दतीने निवडण्यात यायचे होते. त्यापैकी २९६ सदस्य ब्रिटीश प्रांतातून व ९३ हिंदी संस्थानातून निवडायचे होते. अशी ३८९ सदस्यांची घटनासमिती निश्चित करण्यात आली होती.

कॅबिनेट मिशन योजनेनुसार जुलै १९४६ मध्ये घटनासमितीच्या सदस्यांची निवडणूक घेण्यात आली. २९६ जागांपैकी २११ जागा कॉंग्रेस पक्षाला आणि ७३ जागा (७८ पैकी) मुस्लिम लीगला मिळाल्या.

घटनासमितीच्या सदस्यांची निवड खालीलप्रमाणे केली होती.

१ स्थुल स्वरुपात १० लाख लोकांचा एक प्रतिनिधी घटना समितीत घेण्यात आला.

२ प्रतिनिधींची निवड प्रांतांच्या विधानसभांच्या सदस्यांकडुन अप्रत्यक्ष रितीने करण्यात आलेली होती.
३ कोणत्या प्रांतात किती हिंदू धर्मिय, मुस्लीम व अन्य धर्मिय आहेत हे विचारात घेऊनच त्या-त्या प्रांतातून प्रतिनिधी घेण्याची घटनासमितीत तरतूद होती. यासाठी प्रमुख तीन वर्ग - मुस्लीम, शिख आणि बिगर मुस्लीम
४ प्रांतिय विधानसभांना असा अधिकार देण्यात आला होता कि, या ३ वर्गातील विधानसभेचे सदस्य प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या निर्वाचन प्रणालीप्रमाणे आपले प्रतिनीधी घटनासमितीसाठी निवडतील

घटनासमितीचे स्वरुप

घटनासमिती सार्वभौम नव्हती. तिचे कार्य कॅबिनेट मिशन योजनेनुसार चालणार होते. घटनासमितीतील प्रतिनिधी जनतेने प्रत्यक्ष निवडुन दिलेले प्रतिनीधी नव्हते. घटनासमितीत विविध पक्षांचे, हितसंबंधी गटांचे प्रतिनिधी होते. कॉंग्रेस पक्ष, मुस्लीम लीग, इंडियन ख्रिस्चन, वर्गीकृत जातीसंघटना पारसी, उद्योग व्यवसाय गट, अँग्लो इंडियन, शीख, आदिवासी, संस्थानिक, स्त्रीया, कायदेपंडित इ. गटाचे प्रतिनिधी घटनासमितीत होते.
डॉ. राजेंद्र प्रसाद, पं. नेहरु, वल्लभभाई पटेल, अब्दुल गफारखान, मौलाना अबुल-कलाम आझाद, डॉ. खरे, डॉ. राधाकृष्णन, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, कन्हैयालाल मुन्सी, टी. टी. कृष्णमचारी, श्रीकृष्ण सिन्हा, पुरुषोत्तमदास टंडन, आचार्य कृपलानी, सर फिरोजखान नून, हृदयनाथ कुंझरु, डॉ. सच्चिदानंद सिन्हा, बॅ. जयकर, डॉ. आंबेडकर, डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी, शंकरराव देव, विजयालक्ष्मी पंडित, सरोजिनी नायडू, ह. वि. कामथ, पट्टाभी सितारामय्या, दुर्गाबाई देशमुख, बेगम रसुल, एन. माधवराव, झाफर अलिखॉ, बाबू जगजिवनराम, चक्रवर्ती राजगोपालचारी, एन. गोपालस्वामी, अय्यंगार, डॉ. जॉन मथाई, मिनू मसानी, राजकुमारी अमृत कौर, फ्रँक अँथनी, सरदार बलदेव सिंग, सरदार हुकुमसिंग, ब्रिजलाल बियाणी, राजबहादूर, रामनाथ गोयंका, डी. पी. खेतान इ. समाजाच्या सर्व स्तरांतील अनुभवी हुशार व्यक्तींचा समावेश घटनासमितीत करण्यात आला होता.

घटनासमितीचे कामकाज

घटनासमितीची पहिली बैठक दिल्ली येथे ९ डिसेंबर १९४६ रोजी घेण्यात आली. तात्पुरते अध्यक्षपद डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांना दिले ते सर्वात वयोवृद्ध सदस्य होते. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद यांची स्थायी अध्यक्ष म्हणुन निवड झाली तेच शेवटपर्यंत घटनासमितीचे अध्यक्ष होते.

९ डिसेंबर १९४६ रोजी सुरु झालेले घटनासमितीचे कामकाज २६ नोव्हें. १९४९ पर्यंत चालले. घटनासमितीचे कार्य २ वर्षे ११ महिने १८ दिवस चालले घटनापरिषदेच्या एकुण ११ बैठका झाल्या. या बैठकांना एकुण १६५ दिवस लागले. घटनेच्या मसुद्यावर ११४ दिवस चर्चा करण्यात आली. घटनासमिती-च्या कामकाजावर एकुण ६३,९६,७२९ रुपये खर्च करण्यात आले.

१९४७ च्या भारतीय स्वातंत्र्य कायद्यानुसार घटनासमितीला अधिकृत समिती म्हणुन स्वतंत्र दर्जा प्राप्त झाला. जुलै १९४६ ते १४ ऑगस्ट १९४७ पर्यंत कॅबिनेट मिशन योजनेनुसार काम करणारी घटनासमिती सार्वभौम नव्हती.

– घटना समितीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका –

घटनापरिषदेच्या २९ ऑगस्ट १९४७ रोजी भरलेल्या बैठकीत घटनेच्या मसुदा समितीची (Drafting committee) निर्मिती करण्यात आली. मसुदा समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करण्यात आली. के. एम. मुन्शी, एन गोपालस्वामी अय्यंगार, अल्लादी कृष्णास्वामी अय्यर, सय्यद मोहंमद सादुल्ला, बी. एन राव, डी. पी. खेतान, टी. टी. कृष्णमाचारी इ. या समितीचे इतर सदस्य होते. श्री बी. एन. राव यांनी घटनासल्लागार म्हणुन काम पाहिले. श्री. एस. एन मुखर्जी यांनी मुख्य मसुदावाचन (Principal Draftsman) काम केले.

मसुदा समितीने २१ फेब्रुवारी १९४८ रोजी घटनेचा मसुदा घटनासमितीकडे पाठविला घटनेच्या मसुद्यावर विचारविनिमय करुन सुचना करण्यासाठी ड्राफ्ट रिपोर्ट प्रकाशित करण्यात आला. आठ महिन्यांच्या कालवधीत भारतीय जनतेकडुन ७६३५ सूचना आल्या. त्यापैकी २४७३ सूचनांवर घटनासमितीने चर्चा केली. घटनेचे तिसरे वाचन होऊन डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या सहीने घटनेला मंजुरी देण्यात आली. घटनापरिषदेने मंजूर केलेल्या भारतीय घटनेत ३९५ कलमे व ९ परिशिष्टे आहेत. (अमेरिका – ७ कलमे, कॅनडा - १४७, ऑस्ट्रेलिया - १२८, द. आफ्रिका - १५३ व चीन १०६)

भारताच्या राज्यघटनेची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासुन सुरु करण्यात आली. २२ जुलै १९४७ ला घटनासमितीने राष्ट्रध्वज मान्य केला.

लॉर्ड माऊंटबॅटन यांची गव्हर्नर जनरल पदासाठी तर पं. नेहरूंची पंतप्रधान पदासाठी निवड करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेमध्ये भारतीय जनतेचे प्रतिबिंब कसे उमटेल भारतीय जनतेच्या अपेक्षांना न्याय कसा मिळेल याचा विचार करून चौफेर राज्यघटना बनविली गेली त्यामुळे त्यांना राज्यघटनेतील योगदान विचारात घेऊन घटनेचे शिल्पकार

म्हणुन ओळखले जाते.

भारतीय राज्यघटना

कोणत्याही देशाची राज्यघटना अचानक निर्माण झालेली नसुन ती टप्याटप्याने विकसित होते. देशाच्या परिस्थीतीनुरुप राज्यघटना बनविली जाते. भारताने आपल्या परिस्थीतील अनुकूल बाबींचा विचार करुन राज्यघटना बनविलेली आहे. १९४७ला भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारतासमोर अनेक प्रश्न होते. उदा० भारतीय उपखंडाचे दोन भाग पडले होते. भारताची समाजरचना गुंतागुंतीची आहे. आर्थिक परिस्थीती मागासलेली होती. पाकिस्तान शत्रू भारतापुढे होता. या पार्श्वभूमीवर एक प्रगल्भ व्यवस्था भारतात निर्माण होणे आवश्यक होते. म्हणुन भारताने लिखित राज्यघटनेचा स्विकार केला.

राज्यघटनेवर प्रभाव टाकणारे विचार

९ डिसेंबर १९४६ ला राज्यघटना बनविण्याची प्रक्रिया सुरु झाली. २६ नोव्हेंबर १९४९ पर्यंत ही प्रक्रिया चालू होती. एवढ्या प्रदिर्घ काळात सर्वांगिण बाबींवर प्रकाश टाकणारी राज्यघटना तयार झालेली आहे. या राज्यघटनेवर भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय भौगोलिक परिस्थीती, भारतीय विशेष मुल्य जोपासणारी संस्कृती आणि जागतिक स्तरावर मान्य पावलेल्या राज्यघटना यांचा प्रभाव पडला.

१ भारतीय संघराज्याचा १९३५ चा कायदा :-

भारतीय संविधानातील जवळजवळ २/३ भाग हा १९३५ च्या कायद्यातून उचललेला आहे. उदा० संघसरकार राज्यसरकार यांचे स्थान त्यांच्यातील संघसूची, राज्यसूची, समवर्ती सुचींमध्ये अधिकार विभागणी. राष्ट्रपतींचे आणिबाणी विषयक अधिकार, प्रांतिक स्वायतता संविधानातील न्यायालयाचे स्थान इ. बाबींचा या कायद्याने प्रभाव टाकला आहे. यासंदर्भात श्रीनिवासन म्हणतात भारतीय संविधान हे १९३५ च्या कायद्याचे प्रतिकृती आहे.

२ अमेरिकन संविधान :-

भारतीय संविधानाने अमेरिकन संविधानातील उद्देश पत्रिका मुलभुत अधिकार, सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार, संविधान दुरुस्ती पध्दती, देशाच्या प्रमुखाच्या अधिकारांचे स्वरुप, इ. ठळक बाबी स्विकारलेल्या दिसतात.

३. आयर्लंडचे संविधान :-

या राज्यघटनेतुन राजनितीची मार्गदर्शक तत्वे

राष्ट्रपतींच्या निवडीसाठी निर्वाचन मंडळाची स्थापना. राज्याच्या प्रतिनिधी सभागृहामध्ये साहित्य, कला, शास्त्र, समाजसेवा या क्षेत्रातील नामवंत व्यक्तींची नेमणूक पध्दती इ. बाबी या संविधानातुन घेतल्या आहेत.

४ कॅनडाचे संविधान :-

या संविधानापासुन संघराज्य पध्दती उचललेली असुन अधिकार केंद्रीय प्रवृत्तीचे कसे राहतील याचा विचार केलेला आहे. युनियन तत्वाप्रमाणे विशेष अधिकार केंद्रास देणे ही पध्दती कॅनडाच्या संविधानातून आपण स्विकारलेली आहे.

५ ऑस्ट्रेलीया :-

केंद्रसरकार आणि राज्यसरकार यांचे अधिकार क्षेत्र समवर्ती सुचीच्या संदर्भात केंद्र आणि राज्यांमध्ये संघर्ष सुरु झाल्यास केंद्राचे श्रेष्ठत्व सिध्द करणारी पध्दती, उद्देश पत्रिकेची भाषा मांडणी या संविधानापासुन घेतली आहे.

६ ब्रिटिश पध्दती :-

भारताने ब्रिटीश व्यवस्थेप्रमाणे संसदीयशासनपध्दती स्विकारलेली आहे. मात्र ब्रिटीश पध्दती जशीच्या तशी स्विकारलेली नाही. उदा० ब्रिटीश प्रमुखाप्रमाणे भारतीय प्रमुख रुढी परंपरेवर आधारित पदावर येणार नाही त्याची जनतेकडुन अप्रत्यक्षपणे निवड केली जाईल.

७ संशोधन पध्दती :-

भारतीय घटनाकारांनी संविधानाचा अभ्यास करतांना संविधानात संशोधन करतांना जो आराखडा अपेक्षित मानलेला आहे तो आराखडा द. आफ्रिकेच्या संविधानानुसार स्विकारलेला आहे.

## सरनामा

भारतीय संविधानाचा पाया सरनामा आहे. त्यामुळे सरनामा संविधानाचा आत्मा आणि आधार मानले जाते भारताला स्वातंत्र्य मिळविण्यापूर्वी भारतीय संविधान कर्त्यासमोर काही स्वप्न बाळगली होती ती प्रत्यक्षात साकार करण्याचा प्रयत्न सरनाम्याने केलेला आहे. १३ डिसेंबर १९४६ ला भारतीय घटनापरिषदेत घटनेचा उद्देश स्पष्ट करणारा ठराव नेहरूंनी मांडला त्याप्रमाणे सार्वभौम प्रजासत्ताक राज्य तत्वावर आधारित सरनामा संविधानाला जोडलेला आहे. सरनाम्याचा अभ्यास करतांना काही ठळक बाबी समोर ठेवून सरनाम्याचा अभ्यास केला जातो.

१ भारतीय राज्यघटनेतील सरनामा
२ सरनाम्यात स्पष्ट होणारे तत्व
३ i) घटनेचे उगमस्थान
ii) राज्यव्यवस्थेचे स्वरूप
iii) भारतीय राज्यव्यवस्थेचा उद्देश

१ सरनामा :-

२६ नोव्हेंबर १९४९ ला संमत झालेल्या आणि २६ जानेवारी १९५० ला अंमलात आलेला सरनामा पुढीलप्रमाणे

"आम्ही भारतीय लोक भारताचे सार्वभौम, प्रजासत्ताक, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, गणराज्य निर्माण करण्याचे आणि भारताच्या सर्व नागरिकांना

न्याय :- सामाजिक, धार्मिक राजकीय
स्वातंत्र्य :- विचार उच्चार श्रद्धा उपासना
समता :- दर्जा व समान संधी
बंधुता :- व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकात्मता

यांची शाश्वती देण्याचे आमच्या घटना समितीत आज नोव्हेंबर १९४९ च्या २६ व्या दिवशी विचारपुर्वक ठरवित आहेत ही घटना आमच्यासाठी तयार मान्य आणि स्विकृत करीत आहोत.

२ सरनाम्यात स्पष्ट होणारी तत्वे / तात्विक आधार
i) घटनेचे उगमस्थान :-

भारतीय राज्यघटना भारतीय जनतेची असुन ती कोणीही भारतीयांवर लादलेली नाही. भारतीय जनतेची इच्छा शक्ती आणि जनतेच्या सार्वभौमत्वाचे प्रतिबिंब सरनाम्यात उमटलेले आहे. उदा. आम्ही भारतीय लोक ही घटना आमच्यासाठी तयार मान्य आणि स्विकृत करीत आहोत यावरून स्पष्ट होते.

ii) सार्वभौमत्व :-

१९४७ पूर्वी भारत ब्रिटिश पारतंत्र्यात होता. त्यावेळी सार्वभौम नव्हता १५ ऑगस्ट १९४७ स्वातंत्र्याबरोबरच भारत सार्वभौम बनलेला आहे. सार्वभौम म्हणजे देशाच्या राजकीय सत्तेवर बाह्य कोणत्याही प्रकारचे वर्चस्व नसणे होय. ह्या तत्वाप्रमाणे स्वातंत्र्यानंतर भारत सार्वभौम बनलेला आहे.

यासंदर्भात काही अक्षेप घेतले घेतले जातात कि आजही भारताने राष्ट्रकुल संघाचे सभासदत्व स्विकारलेले आहे. हा अक्षेप मोडुन काढतांना नेहरु म्हणतात राष्ट्रकुलात राहणे अगर न राहणे हे ठरविण्याचा अधिकार आज इंग्लंडला नसुन भारताला आहे. मित्रत्वाचे संबंध राखण्यासाठी सभासदत्व स्विकारलेले आहे. यासंदर्भात ज्यावेळी भारताची मानहानी होईल भारतीय सार्वभौमत्वाला झळ पोहचेल त्याचक्षणी आम्ही राष्ट्रकुलाचे सभासदत्व सोडुन देऊ यासाठी ब्रिटीशांच्या पाठींब्याची गरज नाही. त्यामुळे भारताचे सार्वभौमत्व अबाधीत आहे.

iii) प्रजासत्ताक :-

प्रजासत्ताक व्यवस्थेमध्ये जनतेच्या ठिकाणी अंतिम सत्ता केंद्रीत झालेली असते. उदा० राज्यकारभार जन इच्छेप्रमाणे चालतो. जनता आपल्या इच्छा आकांक्षा प्रतिनिधी मार्फत व्यक्त करते. प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार जनतेचाच आहे. त्यामुळे जनता सार्वभौम आहे. या संदर्भात डॉ. आंबेडकर म्हणतात आपण फक्त राजकीय लोकशाहीवर संतुष्ट न राहता आपली लोकशाही सामाजिक लोकशाहीत रुपांतरीत केली पाहीजे. कारण खऱ्या अर्थाने राजकीय लोकशाही प्रजासत्ताक होणार नाही.

iv) समाजवाद :-

हा शब्द मुळ राज्यघटनेत नव्हता परंतु न्याय, स्वातंत्र्य समता बंधुता खऱ्या अर्थाने प्रस्थापित करायची असेल तर देशाचे आर्थिक धोरण स्पष्ट झाले पाहिजे. हे धोरण घटनेमध्ये जोपर्यंत येत नाही तोपर्यंत खरा समाजवाद येणार नाही. म्हणुन १९७६ ला ४२ व्या घटनादुरुस्तीने समाजवाद हा शब्दप्रयोग घटनेत केला आहे. यासंदर्भात स्वर्णसिंग म्हणतात 'भारतीय राज्यघटनेतील समाजवाद या शब्दप्रयोगामुळे देशाच्या विकासाची फळे थोड्या लोकांना न मिळता सर्व लोकांना मिळु शकतील हीच कल्पना समाजवादात अभिप्रेत आहे.

v) धर्मनिरपेक्षता :-

हाही शब्द ४२ व्या घटनादुरुस्तीने आणला आहे. त्यानुसार संविधानात सर्व समान दर्जा राहील कोणत्याही धर्माला राष्ट्रीय धर्म न मानता धर्म व्यक्तीची वैयक्तिक आणि खाजगी

बाब समजून कोणत्याही एका धर्माला महत्व दिले नाही शासकीय शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षणाची सोय केली जाणार नाही जबरदस्तीने धर्म लादता येणार नाही. धर्मनिरपेक्षता म्हणजे नास्तीकता नसुन सर्व धर्मांमध्ये समानता प्रस्थापित करणे समतेच्या माध्यमाने बंधुभाव निर्माण करून राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्याचा या विचाराचा मुख्य हेतू आहे.

VII) गणराज्य :-

भारताच्या राष्ट्रप्रमुखाचे पद वंशपरंपरेने बनत नाही. ते निवडणूकीच्या माध्यमाने प्राप्त होते. म्हणजेच ब्रिटीश राजपदाप्रमाणे रुढी परंपरेनुसार राष्ट्रपदी पदावर येत नाही. त्यांची जनतेकडुन अप्रत्यक्ष निवड केली जाते. या निवडणुक प्रक्रियेने भारतीय कोणताही नागरिक राष्ट्रप्रमुख बनू शकतो. म्हणुन भारतीय संविधानात गणराज्य हा शब्दप्रयोग केलेला आहे गणराज्य शासन असले त्याठिकाणी प्रजासत्ताक असतेच असे नाही. उदा. रशिया आणि चिनमध्ये गणराज्य आहे प्रजासत्ताक नाही. इंग्लंडमध्ये प्रजातंत्र आहे गणराज्य नाही. भारतात मात्र जनतेच्या ठिकाणी सत्ता एकवटलेली आहे. आणि प्रत्येक भारतीय नागरिक राष्ट्रप्रमुख बनू शकतो. म्हणुन भारतात प्रजासत्ताक गणराज्य आहे.

३. शासनाचा उद्देश :-

राज्यव्यवस्थेत कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ यांचा समावेश असतो म्हणुन संविधानात उद्देश पत्रिकेद्वारे राज्यव्यवस्थेची उद्दिष्टे स्पष्ट केलेली आहेत. कारण शासनाची काही ध्येये असतात त्यांची पुर्तता त्यांनी केली पाहिजे. त्याशिवाय समाजाला राज्याला पर्यायाने राष्ट्राला स्थैर्य लाभत नसते. भारतीय स्थैर्यासाठी सरनाम्यात शासनाची उद्दिष्टे स्पष्ट केलेली आहेत.

१. न्याय :-

सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय हा राज्यव्यवस्थेचा आत्मा आहे. न्याय म्हणजे व्यक्तीच्या वर्तणुकीचा समाजहिताशी मेळ घालणे या संकल्पनेनुसार समाजाचे जास्तीत जास्त हित पाहणे हा न्यायाचा उद्देश आहे. असा न्याय सामाजिक आर्थिक राजकीय या सर्वच क्षेत्रात प्रस्थापित केल्याशिवाय व्यक्ती आणि समाजाची प्रगती होणार नाही. हे जाणून घेण्यासाठी भारतीय संविधानात समान न्याय प्रस्थापित करण्यावर भर दिला आहे.

२. स्वातंत्र्य :-

आचार विचार श्रध्दा उपासना हे घटक व्यक्तीमत्वाचा विकास

करण्यासाठी महत्वाचे असतात. स्वातंत्र्य म्हणजे उपलब्ध परिस्थितीचा उपभोग घेण्याची समान संधी होय. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही. उलट स्वैराचारी वर्तनाला उचित बंधने घालणे म्हणजे स्वातंत्र्य असते. म्हणुन भारतीय संविधानाने समाज आणि राज्य हिताला बाधा येणार नाही याची दक्षता घेऊन स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला प्रदान केलेला आहे. ही स्वातंत्र्य संविधानात कलम १९ मध्ये सांगितलेली आहेत.

III समता :-

दर्जा आणि समान संधी क्षेत्रात समता प्रस्थापित झाली पाहीजे समता म्हणजे सारखेपणा नाही. तर मानवनिर्मित भेद नष्ट करून सर्वांनाच व्यक्तीमत्वाचा विकास करण्याची समान संधी देणे या तत्वाप्रमाणे भारतीय संविधानाने मानवनिर्मित विषमता नष्ट केलेली आहे. उदा. स्पृश्य-अस्पृश्य, गरिब-श्रीमंत, वरिष्ठ-कनिष्ठ, स्त्री-पुरुष या सर्वांसाठी एकच कायदा आणि कायद्यासमोर एकच संबोधलेले आहे.

V बंधुता :-

व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी बंधुत्वाची गरज असते. भारतात दिर्घकाळची जाती, धर्म, भाषा, प्रांतवाद यांची परंपरा होती. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्याला बाधा येते. राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता राखण्यासाठी वरील भेद नष्ट करुन सर्व नागरिकांमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण करणे आवश्यक आहे. हा विचार समोर ठेवुन भारतीय घटनाकारांनी स्त्री-पुरुषांना समान अधिकार देऊन ऐक्याच्या मार्गातील स्पृश्य-अस्पृश्य अडसर दुर करुन न्याय स्वातंत्र्य आणि समतेच्या पायावर बंधुत्वाची शाश्वती संविधानाने दिलेली आहे. ही उद्दिष्टे प्रत्यक्षात आणण्याची जबाबदारी शासनाकडे सोपविलेली आहे.

सरनाम्याने संविधानाच्या सिध्दांताच्या काटेकोरपणे विचार केलेला आहे. म्हणुन सरनामा संविधानाचा आत्मा आहे. के. एम. मुन्सीच्या मते राज्यघटनेचे तत्वज्ञान व्यक्त करणारे एक राजकीय कुंडली म्हणजे सरनामा आहे. कारण संविधानाचा असा कोणताच भाग नाही कि ज्याचा विचार संविधानाने सोडुन दिलेला आहे. म्हणुन सरनाम्याला संविधानाची Master kee म्हणुन ओळखले जाते. पंडित भार्गव यांच्या मते सरनामा संविधानाचा आत्मा आहे. कारण संविधानाचा अर्थ स्पष्ट करण्यास आणि साध्य करण्याची ती एक नियमावली आहे. म्हणुन संविधानाचा दर्जा मोजण्याची ही एक फुटपट्टी आहे.